# प्रकरण चौथे

# ऐतिहासिक साधनसामुग्रीची प्रकाशने

# प्रकरण चौथे

# ऐतिहासिक साधन सामुग्रीची प्रकाशने

'ऐतिहासिक कागदपत्रे' ही इतिहासाची मुख्य साधने आहेत. मध्ययुगातील मराठयांच्या पराक्रमामुळे अनेकांना विशेषत: पाश्चिमात्यांना मराठयांच्याविषयी एक प्रकारचे कुतूहल निर्माण झाले आणि त्यातूनच हाती येतील ती साधने वापरून त्यांनी मराठयांविषयीच्या इतिहास लेखनास प्रारंभ केला. परंतू या पाश्चात्यांनी मराठयांच्या इतिहासाचे वस्तुनिष्ठपणे लेखन केले नाही असे भारतीय अभ्यासकांना वाटू लागले. तेव्हापासून मराठयांचा खरा इतिहास जाणून घेण्याच्या जिज्ञासेपोटी का.ना.साने, वि.का. राजवाडे, वासुदेव शास्त्री खरे, द.ब. पारसनीस आदि इतिहास संशोधकांनी मराठयांच्या इतिहासाची कागदपत्रे आस्थेने मिळविण्याचे व प्रसिध्द करण्याचे काम सुरू केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या 'निबंधमाला' या मासिकातून इ.स. १८७४ साली 'इतिहास' या विषयावर एक प्रदीर्घ निबंध लिहून पाश्चिमात्य इतिहासकारांची पूर्वग्रहदूषित मते व इतिहासकर्ते मराठे यांच्याबद्दल त्यांनी काढलेले मानहानीकारक उद्गार यासंबंधी विवेचन केले. का.ना. साने यांनी, विष्णुशास्त्री चिपळूणकर व ज.बा. मोडक यांच्या सहकार्याने इ. स. १८७८ साली 'काव्येतिहाससंग्रह' हे नियतकालिक काढले. त्यातून प्रथम 'ऐतिहासिक बखरी' प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. व वाचकांच्या मनात आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाबद्दल आदर निर्माण केला. परंतू 'बखरी' म्हणजे काही अस्सल इतिहास नव्हता. म्हणूनच 'बखरी' बरोबर त्यांनी अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिध्द करण्यास सुरवात केली. तेव्हापासून महाराष्ट्रातील विचारवंतांना अस्सल कागदांचे महत्त्व पटू लागले.

परंतू, इंग्रज सरकारने पेशव्यांच्या पुण्यातल्या दप्तरखान्यातील अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे आपल्या ताब्यात घेतली होती. ब्रिटीशांच्या या दडपशाहीच्या

धोरणाला विरोध म्हणून मराठी संशोधकांनी महाराष्ट्रातील जुन्या ऐतिहासिक घराण्यांची कागदपत्रे मिळविण्याचे कार्य सुरू केले. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी या कामी फार महत्त्वाची कामगिरी केली. 'बखरी' पेक्षा अस्सल कागदपत्रे ही इतिहासाचे सत्यदर्शन घडण्यास अव्वल दर्जाची साधने आहेत. असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते, "एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे." अनेक हालअपेष्ठा सहन करून, आयुष्यभर सतत भटकंती करून, मावळातील आणि अन्य भागातील ऐतिहासिक घराण्यांतून असंख्य मोडी कागद त्यांनी मिळविले, त्याचे देवनागरीत लिप्यंतर केले आणि कर्ज काढून ते प्रसिध्द करण्याचा उपक्रम केला. त्या नवीन साधनांचे जतन व्हावे, त्यावर चर्चा व्हावी, त्यायोगे संशोधनाला चालना मिळावी म्हणून आणि मराठ्यांचा इतिहास हा भारताच्या इतिहासाचा भाग आहे याची जाणीव जन-माणसात निर्माण व्हावी म्हणून इ.स. १९१० साली 'भारत इतिहास संशोधक मंडळ' नावाची संस्था पुण्यात सुरू केली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या शीर्षकाखाली आपल्या हयातीत २२ खंड प्रसिध्द केले, आणि त्याच्यानंतर धुळेकरांनी त्यांच्या नावे स्थापन केलेल्या 'राजवाडे संशोधन मंडळाच्या' मार्फत त्यांनी जमा केलेल्या साधनांचे आणखी ३ खंड प्रसिध्द केले. अशारितीने 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालेतून २५ खंडांच्या द्वारे ५८०९ दस्तऐवजांची ६८५९ पृष्ठे १८९८ ते १९४७ या काळात अभ्यासकांना सादर केली गेली.

वासुदेवशास्त्री वामन खरे या प्राथमिक शाळेतील शिक्षकाने मिरज संस्थानच्या दप्तरखान्यात बसून 'ऐतिहासिक लेखसंग्रह' या मालेचे १२ खंड स्वत: आणि त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव श्री. यशवंतराव खरे यांनी ३ असे १५ खंड (१८९७ ते १९४८) प्रसिध्द केले व संशोधकांना ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध करून दिली.

साताऱ्याचे संशोधक द.ब. पारसनीस यांनी नाना फडणविसाचे मेणवली दप्तर, साताऱ्याच्या छत्रपतींचे दप्तर, शिंदे-होळकरांची दप्तरे इ. दप्तरातून बरेच ऐतिहासिक

दस्तऐवज प्रसिद्ध केले. तसेच न्यायमूर्ती म.गो.रानडे यांच्या सहकार्याने पुण्यातील सरकारी 'पेशवे दप्तरात' प्रवेश मिळवून सर्वश्री गणेश चिमाजी वाड व पुरूषोत्तम विश्राम मावजी यांच्या सहाय्याने पेशव्यांच्या रोजनिश्या, तह व करारनामे, सनदापत्रे, निवडपत्रे इ. अस्सल राजकीय व्यवहारांची कागदपत्रे मिळवून आपल्या 'भारतवर्ष' आणि 'इतिहास संग्रह' या नियतकालिकेतून प्रसिद्ध केली. सर जदुनाथ सरकार यांच्या सहाय्याने रियासतकार गो.स.सरदेसाई यांनी १९३०-१९३४ या चार वर्षाच्या काळात पेशवे दप्तरातून निवडलेल्या कागदपत्रांचे ४५ खंड प्रसिध्द केले.

कागदपत्रांच्या प्रसिध्दीची ही प्रक्रिया पुढे भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे; डेक्कन कॉलेज, पुणे; राजवाडे संशोधन मंडळ, धुळे; शाहू संशोधन केंद्र, कोल्हापूर आणि अन्य संशोधकीय संस्थानी सुरू केली. इतिहासाचार्च राजवाडे, ग.ह. खरे, द.ब. पारसनीस, गो.स. सरदेसाई यांचे आदर्श पुढे ठेवून म.म.द.वा. पोतदार, शं.ना. जोशी, त्र्यं.श. शेजवलकर, शां.वि. आवळसकर, वा.सी. बेंद्रे, डॉ. आप्पासाहेब पवार, य.न. केळकर, मा.वि.गुजर, स.मा. गर्गे, पु.म. जोशी यांच्याबरोबरच डॉ. वि.गो. खोबरेकर यांनी दस्ताऐवज प्रसिध्द करण्याचे कार्य चालू ठेवले आणि मराठ्यांच्या सर्वांगिण इतिहासाला उपयुक्त होतील असे अनेक मराठी ऐतिहासिक दस्तऐवज अभ्यासकांना उपलब्ध करून दिले.

## मोडी लिपीचे जाणकार :

मराठ्यांच्या इतिहासाची मुख्य साधने मोडी कागदपत्रे होत. महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या दप्तरखान्यात व जुन्या सरदार वतनदारांच्या घरी ऐतिहासिक मोडी कागदपत्रे सापडतात. मराठेशाहीत राजदरबाराचा पत्रव्यवहार मोडीलिपीत होऊ लागला. त्या काळात झालेला पत्रव्यवहार ऐतिहासिक कागदपत्रे म्हणून पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद व मुंबई येथील दप्तरखान्यात राखून ठेविलेला आढळतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

डॉ. खोबरेकर यांना ऐतिहासिक मोडी कागदपत्रे वाचता येतात याची खात्री करून घेऊनच त्यांची नेमणूक शासकीय सेवेत करण्यात आली.[१] इतिहासाच्या संशोधन प्रक्रियेत मोडी साधनांच्या आवश्यकतेची तीव्र जाणीव डॉ.खोबरेकरांना झाल्यामुळे ते मोडी साधन साहित्याकडे वळले.

## ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे सूचीकरण करण्याची योजना :

१९६० साली डॉ.खोबरेकर महाराष्ट्राच्या पुराभिलेख विभागाचे सहाय्यक संचालक होते. त्यावेळी डॉ.पु.म.जोशी हे पुराभिलेख विभागाचे संचालक होते. डॉ. खोबरेकर यांनी ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे सूचीकरण करण्याची योजना डॉ. पु.म. जोशी यांच्यापुढे सादर केली. तेव्हा डॉ. जोशी यांनी ही योजना पुणे, मुंबई, कोल्हापूर या तिन्ही दप्तरखान्यांत कार्यान्वीत करण्याची जबाबदारी डॉ. खोबरेकर यांच्यावर सोपविली.[२] दप्तरखान्यातील ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास फाईलींची किंवा खंडाची यादी वाचून करणे अत्यंत त्रासदायक, वेळ काढू व फार मोठया श्रमाचा असतो. श्रम आणि वेळ यांचा अपव्यय न करता आपल्या विषयांचे कागद सहजा सहजी टिपण्यास सूचीसारखे दुसरे साधन नाही. कोटयावधी ऐतिहासिक कागदपत्रांची सूची तयार करण्याचे हे अत्यंत परिश्रमाचे परंतू अत्यंत आवश्यक कार्य डॉ.खोबरेकर यांनी अत्यंत निष्ठेने पूर्ण केले.

या योजनेनुसार चार लाख मोडी कागदपत्रांची सूची ४ खंडात प्रसिध्द करण्याचे कार्य डॉ. खोबरेकरांनी केले. पुणे येथील पेशवे दप्तरात क्र. १ चे 'शाहू दप्तर' आहे, त्यातील कागदांच्या सूचीचे दोन खंड त्यांनी प्रसिध्द केले. तसेच 'चिटणीस दप्तर' व 'संशोधनासाठी निवडलेले कागद वर्णनात्मक सूची' तर कोल्हापूर दप्तरखान्यांतील 'निवडी दप्तर' विभागातील मोडी कागदपत्रांची वर्णनात्मक सूची छापण्यात आली.[३]

## कोल्हापूर दप्तरखान्यातील ऐतिहासिक कागदपत्रांचे वर्णनात्मक सूचीकरण:

डॉ.खोबरेकर यांनी प्रथम कोल्हापूर दप्तरातील सूची करण्याचे काम हाती घेतले.

कारण हया दप्तरातील अगणित कागद संभारातून आपल्या विषयापुरते नेमके कागद कसे शोधून काढावे हा प्रश्न अभ्यासूंना भेडसावीत होता. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू डॉ.अप्पासाहेब पवार यांनीही ही निकड व्यक्त केली होती. तेव्हा कोल्हापूर अभिलेख कार्यालयातील निवडी दप्तरांतील सूचीकरण करण्याचे काम डॉ. खोबरेकर यांनी हाती घेतले.[४]

## कोल्हापूर अभिलेखालय : वर्णनात्मक सूची खंड – १, निवडी (चिटणीशी) दप्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची :

कोल्हापूर येथील दप्तरखाना म्हणजे महाराष्ट्रातील शिवकालीन कागदपत्रे असलेले भांडार, महाराणी ताराबाई शाहू महाराजांशी भांडून गेल्यावर त्यांनी पन्हाळा येथे राजधानी करून कोल्हापूरच्या गादीची स्थापना केली. त्यांनी आपल्याबरोबर शिवकालीन कागदपत्रे नेले असावेत. परंतु सध्या कोल्हापूरच्या दप्तरखान्यात जे कागदपत्रे आहेत त्यावरून असे दिसते की, शिवकालीन कागदपत्रे त्यात कमी आहेत. याचे एक कारण असे सांगण्यात येते की, ज्या कोठडीत ऐतिहासिक कागदपत्रे ठेविली होती त्यास सन १८१० च्या सुमारास आग लागली. यात बहुतेक जुने कागद आगीच्या भक्षस्थानी पडले असावेत. तरीदेखील सध्या अस्तित्वात असलेली कागदपत्रेही महत्त्वाची आहेत. कोल्हापूर दप्तरखान्यात एकंदर ४ लाखांवर कागदपत्रे असून रूमाल संख्या ४२०० आहे. या रूमालांची निवडी, पारसनिशी, चिटणीशी, हुजर, खाजगी, जमेनिशी, हुजूर खजिना, किल्ले आणि पागा, मुख्य कारभारी जमाबंदी, कैफियती, पेटा आणि हुजूर दफाता, फारसी कागदपत्रे, मिरज, कुरूंदवाड, कागल, सरलष्कर, हिंमत बहाद्दर इ. प्रकारे त्यांची विभागवार मांडणी केलेली आहे. यापैकी निवडी दप्तर हा पहिला विभाग होय. या दप्तरात १५४ रूमाल असून एकूण कागद संख्या २४,९९५ आहे. त्यांचा काळ सन १६९९ ते १८०० आहे. प्रत्येक रूमालात कागदपत्रांची लहान-लहान पुडकी असून त्यातील कागद कालानुक्रमे लावलेले आहेत.

सूचीतील आशयावरून असे दिसते की, या विभागात छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी व राजाराम महाराज यांच्या संबंधीचे फारच थोडे कागद आढळतात. महाराणी ताराबाईकालीन कागद मात्र यात बरेच सापडतात.

कोल्हापूरकर दूसरे शिवाजी महाराज हे सन १७१० मध्ये गादीवर आले. या सूचीत त्यांच्या नावाच्या सनदा व आज्ञापत्रे खुद्द महाराणी ताराबाई यांच्या हातच्या आहेत. पेशवा व सेनापती यांना त्यांनी वेळोवेळी जी आज्ञापत्रे पाठविली आहेत त्यावरून राज्यकारभाराविषयी त्यांचे वर्चस्व दाखविणारे कागदपत्र सारांशरूपाने सूचीत समाविष्ठ केलेले आढळतात. सूचीतील काही सारांशावरून स्वतंत्रपणे न वागण्याबद्दल रामचंद्रपंत अमात्य यांना व इतर सरदारांना त्यांनी वेळोवेळी ताकीदपत्रे दिलेली आढळतात. महाराणी ताराबाई व शिवाजी यांच्यावर सन १७१३ नंतर राजसबाई व संभाजी यांनी रामचंद्रपंत अमात्य यांच्या मदतीने वर्चस्व गाजविल्याचे दिसते.

या सूचीत छ. संभाजी (१७१५ ते १७६०), शिवाजी तिसरे (१७६० ते १८१३), शहाजी उर्फ बुवासाहेब, शिवाजी चौथे उर्फ बाबासाहेब, राजाराम दुसरे यांच्या कारकीर्दीतील कागदपत्रे आढळतात. ब्रिटीशांबरोबर (ईस्ट इंडिया कंपनी) कोल्हापूरकरांचे असलेले संबंध, पेशव्यांशी सतत होत असलेले झगडे, कोल्हापूरकरांचा सन १७६६ व १८१२ मध्ये कंपनी सरकारशी झालेला तह व या तहान्वये मालवण सिंधुदूर्गावरील सोडलेला ताबा, पंत अमात्यांकडील राशिवडे व सालवण हे कोल्हापूरकरांनी काढून घेतले, इचलकरंजीकरांनी छत्रपतींच्या तेरदळ जहागिरीवर पाठविलेल्या फौजा, १८१३ मध्ये छत्रपतींच्या फौजेने कागल जहागिरीत मांडलेला उपद्रव इ. प्रकरणांवरून कोल्हापूरकरांचे त्यांच्या जहागिरीदार सरदारांशी संबंध विशेष चांगल्या प्रकारचे नव्हते असे सूचीतील कागदपत्रांवरून दिसते. रास्ते यांच्या सरंजामाची जप्ती, वसंतगडातून त्रिंबकजी डेंगळे यांचे पलायन, बाजीरावाचा खडकी येथे ब्रिटीशांबरोबर झालेल्या लढाईत पराजय इ. महत्त्वाच्या घडामोडीच्या नोंदी या सूचीत आढळतात. सन

१८४४ मध्ये झालेला गडकऱ्यांचा उठाव, त्यांना आश्रय न देण्यासंबंधीचे काढलेले हुकूम, धार्मिक कारणास्तव वा सेवा चाकरीबद्द दिलेल्या इनामांच्या सनदा, हिंमत बहाद्दर, सरलष्कर, कागलकर इ. सरंजामदार व सरदार यांना हुजूरी येण्याबद्दल दिलेले हुकूम, व्यापार उदीम, वसाहत इ.साठी व्यापाऱ्यांना दिलेल्या सवलती, गावागावाच्या सीमा तंटयाचे निवाडे, वतन निवाडे यासंबंधी दिलेली आज्ञापत्रे या सूचीत आढळतात.[५]

सूचीच्या शेवटी व्यक्ती सूची आणि स्थळसूची दिल्यामुळे अभ्यासूंस हवा तो कागद नेमका शोधून काढणे फारच सोपे झाले आहे. कोल्हापूर दप्तरखान्यातील ऐतिहासिक कागदपत्रांचे सूचीकरण केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी डॉ. खोबरेकरांची प्रशंसा केली होती.[६]

## पेशवे दप्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची :

पुणे येथील पेशवे दप्तरात छत्रपती शाहूच्या कारकीर्दीपासून ते सन १८१८ पर्यंतची मराठयांच्या राज्यकारभाराची सर्व कागदपत्रे आहेत. ती मोडी लिपीत आहेत. मोडी कागदपत्रांची दप्तरे एकूण चाळीस हजार असून त्यातील सर्व कागद एकूण तीन कोटीच्या वर आहेत. पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे एकूण छत्तीस विभाग आहेत. यात मराठयांचा राज्यकारभार, त्यांच्या चालीरीती, त्यांचा आर्थिक व सामाजिक इतिहास, नौदल, किल्ले, मराठी धनदौलत यांची माहिती या कागदांत आहे.[७] त्यामुळे मराठेकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जीवनाच्या विषयांवरील माहिती या कागदपत्रांचा अभ्यास केल्यावर मिळू शकते. पण हे कागदपत्र मोडी लिपीत आहेत.

प्रसिध्द प्राच्य विद्यापंडीत ए.एम्.टी. जॅक्सन यांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांच्या कॅटलॉगची आवश्यकता आपल्या रिपोर्टात प्रतिपादिली आहे. ते म्हणतात, " हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही सरकारपाशी पुणे दप्तराइतके महत्त्वाचे व स्थानिक भाषेतले दप्तर नाही. या देशाचा अभ्यास करणाऱ्यांना हा संग्रह अभ्यासता यावा अशी

व्यवस्था सरकारने करावी.'' या दप्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची नसल्यामुळे संशोधकांना आपल्या ऐच्छिक विषयावरील कागद शोधून काढण्यास शेकडो दप्तरे व हजारो कागद पहावे लागत असत. त्याकरीता कित्येक महिने सतत खपावे लागत असे तेव्हा भारत सरकारने नियुक्त केलेल्या रिसर्च ॲण्ड पब्लिकेशन कमिटीने ८ जुलै १९६० रोजी भरलेल्या बैठकीत, ''राज्यसरकारानी आपापल्या दप्तरखान्यातील कागदपत्रांच्या वर्णनात्मक सूची तयार करवून घेऊन त्या प्रसिद्ध कराव्या व या कामास प्राधान्य द्यावे'' अशी शिफारस केली. या सर्व सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागातील सहाय्यक संचालक पदावर असताना डॉ. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरांतील ऐतिहासिक कागदपत्रांच्या वर्णनात्मक सूचीकरणाबाबत योजना तयार केली.[८]

सन १९६१ पासून डॉ. खोबरेकरांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांची सूची करण्यास सुरवात केली. सूची करताना दप्तरांतील कागदपत्रे विषयानुक्रमे व कालानुक्रमाने जुळविण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. अशा रितीने पेशवे दप्तरातील पहिल्या क्रमांकाचे दप्तर 'शाहू दप्तर' यात ५६ रूमाल असून एकंदर कागदसंख्या ८०,५३९ आहे. या ऐतिहासिक कागदांचा कॅटलॉग करण्याच्या कामास सुरवात होऊन ते काम सन १९६४ अखेर पूर्ण झाले.[९]

डॉ. खोबरेकरांच्या या कार्यामुळे पेशवे दप्तरात न जाता घरबसल्या या सूची खंडाचा वापर अभ्यासकांना करता येऊ लागला आहे. त्यांनी तयार केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या सूचीमुळे अभ्यासकांना व संशोधकांना बहुमोल वेळ वाचवून त्यांना हवी असलेली माहिती तात्काळ व अचूकपणे उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

## मराठेकालीन प्रसिध्द व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे :

शासकीय सेवेत असताना डॉ.खोबरेकर आणि डॉ. दिक्षीत यांनी 'मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे' हे पुस्तक १९६९ मध्ये प्रसिध्द केले. महाराष्ट्र

ऐतिहासाच्या प्रांगणात प्रामुख्याने वावरलेल्या ५४ ऐतिहासिक स्त्री पुरूषांनी लिहीलेल्या हस्ताक्षरांचा संग्रह त्यांनी या पुस्तकात केला आहे.[१०] मराठाकाळात राजकारणी पुरूषांच्या हालचाली कशा होत? राजकीय, सामाजिक, आर्थिक बाबतीत हया व्यक्तींनी जो प्रपंच मांडला, त्याचे मूळ स्वरूप कसे होते? त्यांचा एकमेकांशी पत्रव्यवहार कसा होई? हे सर्व जाणण्याचे कुतूहल बहुतेक इतिहास अभ्यासकांस असते. ज्या गोष्टींविषयी आपण इतिहासात वाचतो त्या गोष्टी घडत असता प्रत्यक्ष लेखाद्वारे प्रमुख व्यक्ती त्या कशातऱ्हेने व्यक्त करीत, अशा प्रकारच्या पत्रव्यवहारादी साधनांचे मूळ स्वरूपात साक्षात दर्शन करण्याचा डॉ.खोबरेकर यांनी प्रयत्न केला आहे.

मराठ्यांच्या इतिहासाची बहुतेक साधने मोडी लिपीत आहेत. या साधनांचा इतिहासासाठी उपयोग करून घेण्यासाठी मोडी वाचनाचा सराव असणे अत्यंत गरजेचे आहे. मोडी लिपीतील अक्षरे वाचून त्यांचे वळण व वेगवेगळया काळातील फरक समजावेत, वाचण्याचा सराव व्हावा व त्याचबरोबर हया साधनांचे मूळ स्वरूप लक्षात यावे म्हणून ही साधने त्यांच्या मूळ लिपीत म्हणजे मोडीत छापण्याचे कार्य डॉ. खोबरेकर यांनी केले आहे. या ग्रंथात सर्व मोडी काग़द मुळावरहुकूम उपलब्ध करून दिलेला असल्यामुळे त्याचे सम्यक दर्शन अभ्यासकांना घडते. तसेच मूळ पत्रांबरोबरच त्यांचे बालबोधी रूपांतरही शक्य तितके समोरासमोर दिल्यामुळे मोडी वाचन सोपे झाले आहे.[११]

डॉ.खोबरेकर यांनी प्रसिध्द केलेल्या या पत्रांवरून पत्रे लिहिण्याची तत्कालिन पद्धती लक्षात येते. तसेच या पत्रांवरून तत्कालिन राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थिती लक्षात येते. उदाहरणार्थ छत्रपती राजाराम यांच्या पत्रात, सदाशिव नाईक सौंदेकर यांस 'अकोले वगैरे महाल व गडकोट वंशपरंपरा बहाल केली आहे.[१२] यावरून वंशपरंपरा, हक्क समजतात. तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या पत्रात त्यांनी पंतप्रधान बाजीराव यास सरकार कोठीकडे शिरस्त्याप्रमाणे मिठाचा पुरवठा होऊ देऊन त्यावरील जकात पेन बंदरी न घेणे अशी आज्ञा केली आहे. छत्रपती आपल्या हुकूमाने जकात कशी

माफ करत असत याचे उदाहरण यात आहे.[१३] यावरून आर्थिक व्यवहार समजतात. राज्यातील बंडखोर सरदारांचा बंदोबस्त पेशवे बाळाजी विश्वनाथ कसा करीत हे त्यांच्या (बाळाजी विश्वनाथ) पत्रावरून दिसते. यामध्ये भोजजी पाटील अक्कल कोटकर हे हरामखोरी करतात म्हणून त्यास कैद करून दंड केल्याचा उल्लेख आहे.[१४] यावरून न्यायव्यवस्था लक्षात येते. चिमणाजी बल्लाळ उर्फ चिमाजीअप्पा यांच्या पत्रावरून मोठ्या प्रमाणात दारूगोळा खरेदी करण्याची सुरूवात बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दीत झाली असे दिसते.[१५] अहिल्याबाई होळकर यांच्या पत्रातून त्यांच्या राजकारणातील सहभाग स्पष्ट होतो. पेंढाऱ्यांची फौज सरकार चाकरीत ठेवण्याचा धोका त्या पत्राने पंतप्रधानांच्या नजरेत आणीत आहेत हे दिसते.[१६] त्रिंबकजी डेंगळे हे आपल्या पत्रातून 'तगादा करून ऐवज वसुलात आणावा' असे सदाशिव भिकाजी यास कळवीत आहे.[१७] यावरून मराठेकालीन पतपेढी व्यवस्था लक्षात येते.

या ग्रंथातील पत्रे ही इतिहासाची मूळ साधने असल्याने अधिक विश्वसनीय आहेत. कै.द.वि.आपटे व प्रो. रा.वि. ओतुरकर यांनी 'साधन परिचय' अर्थात मराठयांचा पत्ररूप इतिहास या नावाचे पुस्तक प्रसिध्द केले होते. यावरून मूळ साधनांवर आधारलेल्या इतिहासाची जनमनावरील पकड दिसून येते. परंतू या ग्रंथात मोडी कागदांचे सम्यक दर्शन वाचकास होत नाही. डॉ. खोबरेकर यांच्या या प्रकाशनामुळे ही उणीव भरून निघाली आहे.

## कोकणच्या इतिहासाची साधने - (१६९२-१८२८)

डॉ.खोबरेकर यांनी श.स.शिंदे यांच्या सहकार्याने 'कोकणच्या इतिहासाची साधने' हा ग्रंथ प्रकाशित केला. यामध्ये प्रकाशित केलेली कागदपत्रे कोल्हापूर रेकॉर्ड्स ऑफिसमधून निवडलेली आहेत. ही कागदपत्रे म्हणजे छ. राजाराम महाराज व कोल्हापूरच्या राजांनी वेळोवेळी काढलेली आज्ञापत्रे आहेत. त्या काळात राज्यकारभार

कसा चालत असे याची माहिती आपल्याला या आज्ञापत्रांद्वारे मिळते.[१८] आज्ञापत्रे नं. ८,११,४५,९१,जी छत्रपतींनी इनाम म्हणून, लढाईत धारातीर्थी पडलेल्यांच्या सगळयात जवळच्या नातलगांना काढली होती, त्यावरून लढाईत धारातीर्थी पडलेल्यांच्या वारसांना बक्षिसे देण्याऱ्या परंपरेची माहिती मिळते. गोव्यामध्ये कोल्हापूरच्या राजांचा देवजी नाइक हा दूत होता. सुबराव कृष्ण अमात्य, ज्यांच्याकडे कोकणच्या घडामोडींची जबाबदारी होती, त्यांना गोव्याच्या प्रतिनीधीने त्यांची जुनी मैत्री ठेवण्याबाबत विनंती केली होती. हे ८९ नं. च्या कागदपत्रावरून समजते. पत्र क्र. ८२, १०९, १६५ मध्ये आलेल्या गैबी पीर, रामनवमी या सणांच्या उल्लेखावरून तत्कालीन सण-उत्सवांची कल्पना येते.[१९]

कोल्हापूरचे राजे व बावडा प्रमुख यांच्यातील संबंध हे किती चांगले होते हे १३२, १३३, १३४, १३७ नं. च्या कागदपत्रांवरून दिसून येते. कोल्हापूरचे राजे हे बावडाप्रमुखांना आपल्या मुलासारखी वागणूक देत. कागदपत्रे नं. १३५, १५७, १६० वरून समजते की देशकुलकर्णी वतन व वतनदारांची इतर इनाम वतने अनेकदा काढून घेवून ती राज्याला मदत करणाऱ्या व्यक्तीला दिली जात.[२०]

मराठा काळातील सामजिक व आर्थिक परिस्थिती समजून घेण्यासाठी ही कागदपत्रे महत्त्वाची साधने आहेत.

### तारीखे दिल्कुशा (सर जदुनाथ सरकार बर्थ सेंटेनरी कॉममोरेशन व्हॉल्युम) -

भीमसेन सक्सेना नावाच्या उत्तर प्रदेशीय हिंदू गृहस्थाने आपले आत्मचरित्र १७०९ मध्ये लिहीले. तेच 'तारीखे दिल्कुशा' होय. भीमसेन सक्सेना औरंगजेबाच्या नोकरीत असून तो दक्षिणेत मोगल फौजेबरोबर फिरत होता. त्याने ५० वर्षातील शिवकालात घडलेल्या राजकीय उलाढालींच्या हकिकती यामध्ये लिहील्या आहेत.

'तारीखे दिल्कुशा' या ग्रंथाच्या अर्ध्या भागाचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी केले. राहिलेल्या अर्ध्याचे श्री.खोबरेकर यांनी करवून घेऊन हे दोन्ही भाग टिपांसह



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

इंग्रजीत 'सर जदुनाथ सरकार बर्थ सेंटेनरी कॉममोरेशन' व्हॉल्युम म्हणून प्रसिध्द केलेला आहे.[२१]

मराठ्यांच्या सर्वांगिण इतिहासाचा अभ्यास करीत असताना शत्रुपक्षातील लोकांचा शिवाजीकडे पाहण्याचा दृष्टीकोन व त्यांनी शिवाजीचे केलेले मूल्यमापन या गोष्टी तपासावयाच्या असतील तर तत्कालीन फारसी साधन साहित्याशिवाय पर्याय नाही. फारसी साधनांचा अभ्यास केल्याशिवाय मराठयांचा इतिहास शास्त्रशुद्ध दृष्टीकोनातून चिकित्सक पद्धतीने अभ्यासता येत नाही. मराठयांचा मोगल, आदिलशहा, कुतूबशहा यांच्याशी असलेल्या संबंधांची यथार्थ कल्पना फारसी साधनांच्या अभ्यासाशिवाय येऊ शकत नाही. म्हणून मराठयांच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने डॉ. खोबरेकर यांनी इंग्रजी भाषांतर केलेला हा ग्रंथ महत्त्वाचा आहे.

शिवाजी महाराजांचे व्यक्तीमत्व[२२], अकबराने औरंगजेबास तख्यावरून खाली काढण्यासाठी संभाजी महाराजांस पत्र लिहून त्यांची मदत मागितली होती[२३], झुल्फीकारखानाबरोबर असलेले अनेक दख्खनी मनसबदार त्याला सोडून राजारामास मिळाले होते.[२४] आणि धनाजीने राजाराम महाराजांस भासविले की, संताजीचा जोर वाढला आहे, तो शूर व कुशल शिपाई आहे. तो स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहे त्याला ठार मारले पाहिजे.[२५] यासारखी भीमसेन सक्सेना यांनी तारीखे दिल्कुशामध्ये दिलेली दुर्मिळ माहिती डॉ.खोबरेकर यांच्या या ग्रंथाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. मराठी अभ्यासकांना याचा उपयोग होईलच पण हा ग्रंथ इंग्रजी असल्यामुळे अमराठी अभ्यासकांनाही मराठ्यांच्या इतिहासाचा हा साधनग्रंथ अभ्यासता येईल.

## महाराष्ट्र अर्काइव्हज बुलेटीन :

इ.स. १९६१ ते १९६९ या नऊ वर्षात डॉ. खोबरेकर यांनी पुराभिलेख विभागात संशोधन प्रमुख म्हणून कार्य केले. इ.स. १९६१ पासून पुराभिलेख विभागाने 'अर्काइव्हज

बुलेटीन' प्रसिध्द करण्याची योजना हाती घेतली.[२६] पुराभिलेख विभागाच्या संग्रही असलेल्या आणि त्या विभागाने मुद्दाम मिळविलेल्या अव्वल ऐतिहासिक साधनांचे प्रकाशन या बुलेटीनद्वारे करण्यात येते.[२७]

या योजनेत प्रथमत: पुराभिलेख विभागात जमविलेल्या 'इंग्रजांचे संशयाचे नानासाहेब' या संबंधीचा इ.स. १८५७ ते १९१२ पर्यंतचा पत्रव्यवहार बुलेटिनमधून प्रसिध्द करण्याचे ठरले. इ.स. १८५७-५८ च्या धुमश्चक्रीत दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक पुत्र धोंडोपत नाना आपला पाठलाग होत असता परिवारासह नेपाळांत शिरला. त्यांजबरोबर त्याच्या कुटूंबाचा बराच मोठा परिवार होता. नेपाळ नरेशानी नानास आश्रय नाकारून त्याच्या बायका मुलांस नेपाळात राहू दिले. नानासाहेब तराईत निवर्तले ही बातमी नेपाळ राणा जंगबहाद्दूर याने इंग्रजांस कळविली. इंग्रजांचा मात्र नानाच्या मृत्यूवर कधीच विश्वास बसला नाही. नाना कुठेतरी बेपत्ता झाला एवढेच ते समजत होते. तो इराण काबूलकडे गेला असावा अशी अफवा उठली. तो जिवंत असून बैऱ्याग्याच्या किंवा शेतकऱ्याच्या वेशांत फिरत असावा असा संशय इंग्रज अधिकाऱ्यांस नेहमीच येई. म्हणून त्यांनी नाना पकडून देणाऱ्यास लाख रूपयापर्यंत बक्षीस लाविले. नानाच्या शरीराचा वर्णनपट सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे रवाना करून हया वर्णनाचा माणूस दिसला तर त्यास पकडून 'तूच नानासाहेब असे कबूल कर' असे सांगून ते तो कबूल करीपर्यंत छळ करावयाचे. असे प्रकार इ.स. १९१२ पर्यंत झाले. अनेक 'खोट्या नानासाहेबांना' इंग्रज सरकारचा छळ सोसावा लागला. ही सर्व हकीगत देणारी कागदपत्रे आर्काइव्हज बुलेटिन क्र. १,९ व १० मध्ये छापली आहेत.[२८]

बुलेटिन क्र.२ मध्ये सर जदुनाथ सरकारांनी केलेल्या इब्रत नाम्याचे इंग्रजी भाषांतर छापले आहे. नानासाहेब पेशव्यांचा पुतण्या रावसाहेब नानासाहेबांसारखाच नाहीसा झाला. त्याच्या सारख्याच दिसणाऱ्या इसमास पकडून इंग्रज अधिकाऱ्यांनी निरपराधी लोकांचा छळ केला यासंबंधीची कागदपत्रे बुलेटिन क्रमांक ३ मध्ये छापली आहेत.[२९]

बुलेटिन क्र.४ मध्ये तीन प्रकरणे प्रसिध्द करण्यात आली आहेत. पहिल्या प्रकरणात मुधोळकर गोविंदराव घोरपडे यांच्या तोतयासंबंधी कागदपत्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. पेशवाईत अनेक तोतये झाले. त्यात भाऊसाहेब पेशवे व जनकोजी शिंदे यांचे तोतये गाजले. त्याचप्रमाणे अव्वल ब्रिटीश अमदानीतही काही तोतये झाले. सवाई माधवराव पेशव्यांची पत्नी यशोदाबाई, चतुरसिंग भोसले, नागपूरकर अप्पासाहेब भोसले इ. अनेक जणांचे तोतये गाजले. त्यातच मुधोळकर गोविंदराव घोरपडे यांचा तोतयाहि एक होता. मुधोळचे घोरपडे घराणे हे दक्षिणेतील जुने मराठे घराणे होय. पेशवाईत या घराण्यातील पुरूषांनी मोठी कामगिरी दाखविली त्यातीलच गोविंदराव घोरपडे हा बापू गोखल्यांबरोबर अष्टीच्या लढाईत धारातीर्थी पडला होता. त्यानंतर ८ वर्षांनी म्हणजे १८२६ मध्ये त्याचा तोतया निर्माण झाला. या तथाकथित गोविंदरावाने मुधोळच्या गादीवर आपला हक्क असल्याचे सांगितले. सरकारने चौकशीसाठी त्याला पुण्याला बोलावले. त्याची पत्नी आणि सख्खा भाऊ यांनाहि त्याची ओळख पटून ते त्याच्याबरोबर राहू लागले. त्याच्या अनेक नातेवाईकांनी गोविंदराव तो हाच म्हणून ओळखले. अनेकांनी तो खरा असल्याबद्दल जबान्या दिल्या. शेवटी १ जानेवारी १८२९ रोजी गव्हर्नर मालकमने सांगलीचे चिंतामणराव पटवर्धन तसेच बळवंतराव रास्ते, अंबाजी घाटगे आदि दक्षिणेतील प्रमुख सरदारांची पंचायत भरवून त्याची चौकशी केली. या चौकशीत तो खोटा ठरला. व त्याला दख्खन सोडून जाण्यास सांगण्यात आले. पुढे २ वर्षांनी हा तोतया मुंबईत येऊन पुन्हा सरकारकडे अर्ज करू लागला. पण सरकारने शेवटपर्यंत आपला निर्णय फिरविला नाही.[३०]

दूसऱ्या प्रकरणात 'नानासाहेबांच्या संशयित अनुयायी' बाबतची माहिती सांगणारे कागद प्रसिध्द करण्यात आले आहेत. नानासाहेब पेशवा याचा अंत कसा झाला याची विश्वसनीय हकीगत न समजल्यामुळे तो जिवंत असून गोसाव्याच्या किंवा फकीरांच्या वेशात लपून असल्याचा पुढे कित्येक वर्षेपर्यंत इंग्रज अधिकाऱ्यांना संशय होता.

वेळोवेळी नानासाहेब किंवा त्यांचे अनुयायी असल्याच्या संशयाने अनेक इसमांना पकडण्यात आले. व संशयाचे निराकरण झाल्यावर सोडून देण्यात आले.[३१]

तिसऱ्या प्रकरणात रघुनाथदादा संबंधी महादजीराम करंदीकर नावाच्या त्यांच्या आश्रिताने लिहून ठेवलेली हकीगत छापण्यात आली आहे. दादासाहेबांच्या मृत्यूनंतर सुमारे ५० वर्षांनी म्हणजे १८३३-३४ मध्ये सांगलीच्या राजेसाहेबांच्या आज्ञेने त्यांनी ही हकीगत लिहीली. राघोबांची हकीकत सांगण्यापूर्वी सुरूवातीला त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांपासूनच्या इतिहासातील त्रोटक नोंदी देऊन १७५९ सालापासूनच्या त्यांच्या हालचालीसंबंधीचे सविस्तर वृत्त दिले आहे. दादांचा माधवराव पेशव्यांशी झालेला सत्ता-स्पर्धेचा झगडा, पुढे नारायणरावाचा खून, बारभाईचे कारस्थान, दादांचे गुजरातेत पलायन, त्यांचे इंग्रजांशी सख्य, वडगावची लढाई, दादाचे शिद्यांच्या स्वाधीन होणे, हरि बाबाजी बरोबर झाशीस रवानगी, दादांचे पुनः गुजरातेत पलायन वगैरे घटना डॉ. खोबरेकर यांनी तपशीलवार सांगितल्या आहेत. पुढे दादासाहेबांचे इंग्रजांशी बिनसू लागले, सालबाईच्या तहानंतर दादांचे सगळे उपाय थकल्यावर त्यांनी गंगातीरी राहण्याचा मनोदय प्रकट केला, पुणे दरबारने त्यांना गंगातीरी आणण्याची व्यवस्था केली. दादांच्या मृत्यूसमयीचे वर्णन डॉ. खोबरेकर यांनी फारच बारकाईने केले आहे. राघोबादादांची ही हकीकत त्यांच्या आश्रितानेच लिहीलेली असल्यामुळे ती ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाची आहे. तसेच ही एकच अशी हकीकत आहे की ज्यामध्ये दादांच्या पानिपतोत्तर जीवनाचा वृत्तांत सुसूत्रपणे गुंफलेला दिसून येतो.[३२]

बुलेटिन क्र.५ मध्ये मुन्नालालने लिहिलेले दुसऱ्या शहा अलम बादशहाचे चरित्र सर जदुनाथ सरकारनी इंग्रजीत भाषांतर केले, ते छापले आहे. त्याच्या जोडीस सन १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील सेनानी तात्या टोपे यांचा पाठलाग चालू असता तो गुजरातेत शिरला, त्यास कोणी कोणी, कुठे कुठे पाहिले यासंबंधी बडोदे व राजपिपला संस्थानांनी इंग्रज सरकारला जी माहिति पुरविली ती छापली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदी

नोकरांनी असे दाखवून दिले की, मिलिटरी अधिकाऱ्यास ज्या सिव्हिल जागा देण्यात येत त्यामुळे सनदी लोकांवर अन्याय होतो. या हकीकतीचे इंग्रजी कागदपत्र बुलेटिन क्र.६ मध्ये प्रसिद्ध केले आहेत. त्याच्या जोडीला सांगली संस्थान ब्रिटिशांचे मांडलिकत्व पत्करत असतानाचा झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. कोकण रेल्वेची सुरूवात करण्यासाठी इ.स. १८६५ मध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये पत्रव्यवहार सुरू झाला. तो इ.स. १८८५ पर्यंत चालला हा पत्रव्यवहार बुलेटिन क्र.७ मध्ये छापला आहे. तसेच दक्षिणाप्राईज कमिटीची स्थापना झाल्यावर त्यांनी बक्षिस योग्य पुस्तकांची परीक्षणे त्या त्या शाखेतील तज्ञांकडून इंग्रजीत करविली त्यांचा व हरिपंत फडके यांच्या स्वाऱ्यांचे मुक्कामाचा समावेश या बुलेटिनमध्ये आहे.[३३]

तात्या टोपेचा सावत्र भाऊ रामकृष्ण बिन पांडूरंग यास बडोद्यास नोव्हेंबर १८६२ मध्ये कैद केले. त्याची तपासणी होऊन त्यास १५ डिसेंबर १८६३ मध्ये सोडून दिले. याबद्दलचा पत्रव्यवहार आर्काइव्हज बुलेटिन नं. ८ मध्ये प्रसिद्ध केला आहे.[३४] तसेच यामध्ये बायजाबाई शिंदे व बायाबाई आपटे (दुसऱ्या बाजीरावाची मुलगी) यांच्या हकीकती छापल्या आहेत.[३५]

महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता आल्यानंतर म्हणजे १८१८ पासून १८८५ पर्यंत ठिकठिकाणी सशस्त्र उठाव झाले. या उठावांमध्ये १८५७ चा उठाव सर्वात मोठा होता. या उठाव्यांच्या इतिहासाचे 'महाराष्ट्र आर्काइव्हज बुलेटिन' ही महत्वाची साधने आहेत. अव्वल दर्जाची ही ऐतिहासिक साधने प्रसिध्द करण्याचे काम डॉ. खोबरेकर यांनी यशस्वीरित्या केले आहे.

## हुतात्मा दामोदर हरि चापेकर यांचे आत्मवृत्त :

प्लेग प्रतिबंध करण्याच्या नावाखाली ब्रिटिश प्लेग कमिशनर रँड याने पुण्यातील नागरिकांवर अत्याचार करून दहशत निर्माण केली. त्याचा खून दामोदर चापेकर या

राष्ट्रवादी युवकाने केला. त्यामुळे दामोदर चाफेकर यांना फाशी झाली. १८९७ मध्ये येरवडा कारागृहात त्यांनी आपली सर्व हकीकत मोडीत लिहून ठेवली. डॉ. खोबरेकर यांनी या मोडी हस्तलिखिताचे बालबोधीकरण व संपादन करून ते प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्वाधीन केले.[३६]

हे मोडी बाड इतकी वर्षे येरवडा कारागृहात होते. ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यामुळे एका क्रांतिकारकाच्या मनाची तळमळ, त्यांनी आपल्या साध्याकरिता केलेले प्रयत्न यांची सर्वांना ओळख होते. दामोदर चाफेकरांनी लिहून ठेवलेली ही हकीकत वाचल्यावर रँन्डसाहेब कोण होता, चाफेकरांना त्याचा खून करण्याची प्रेरणा कशी झाली आणि त्याचा खून त्यांनी कसा केला हे समजते[३७] त्यातून अनेक अज्ञात गोष्टींवर प्रकाश पडला आहे. उदाहरणार्थ रँड चांगला आहे की वाईट याबद्दल चाफेकर बंधूंनी चांगल्या तऱ्हेने चौकशी केली होती.[३८] तसेच दामोदर चाफेकर यांनी रँडचे गुणही सांगितले आहेत. ते म्हणतात, ''रँडसाहेबास कोणतेही व्यसन नसावे, त्याचे ठिकाणी बालटपणा बिलकुल नव्हता, जिमखान्यात तो लँटेनीस खेळत असता आम्ही पाहिला. तो कधीही लेडीबरोबर खेळत नसे, यावरून परस्त्रीचा त्याला तिटकारा होता इ. बरेच गुण त्याचे आमच्या लक्षात आले. पण तो आमचा धर्मशत्रू असल्यामुळे त्याचा उपयोग नव्हता.''[३९]

ब्रिटिशकाळात दामोदर चाफेकरांसारखे देशप्रेमाने वेडे झालेले अनेक तरूण परकीय सत्ता नष्ट करण्यासाठी आपल्या जिवाची कुर्बानी करण्याच्या शर्यतीत उतरले होते. त्यांनी आपले शोषण करणाऱ्या अनेक परकीय सत्ताधीशांचे खून पाडले. त्यावेळी त्यांनी आपल्या जिवाची पर्वा केली नाही. त्यांच्या आत्माहुतीमुळे स्वराज्य मिळण्यास मदत झाली. अशा या शूरवीरांची स्मरणगाथा निश्चितच तरूण पिढीला प्रेरणा देणारी ठरणारी आहे.

शिवाजी महाराजांचा ३०० वा राज्यारोहण समारोह महाराष्ट्रात इ.स. १९७४ मध्ये ठिकठिकाणी साजरा झाला. त्यानिमित्त पुराभिलेख विभागाने वि.गो. खोबरेकर यांनी

संपादित केलेली 'शिवछत्रपतींची स्मारके -ब्रिटीश सरकारचे धोरण' आणि 'शिवकालीन कागदपत्रे' ही दोन प्रकाशने प्रसिद्ध केली.[४०]

## शिवछत्रपतींची स्मारके - ब्रिटिश सरकारचे धोरण

**(Shivaji Memorials - British Attitude) -**

यात रायगड येथील शिवाजी महाराजांची समाधी, शिवनेरी येथील शिवजन्मस्थान, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले शिवाजी उत्सव व शिवसमाधीच्या जीर्णोद्धार विषयक चळवळी इ. संबंधाने ब्रिटीश सरकारचे काय धोरण होते ते दर्शविणारा तत्कालिन इंग्रजी पत्रव्यवहार (इ.स. १८८५-१९२५ पर्यंतचा) प्रसिद्ध केला आहे.[४१]

## शिवकालीन कागदपत्रे - (Records of Shivaji Period)

यात शिवाजी महाराजांच्या काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक इतिहासावर नवीन प्रकाश पाडणारी कागदपत्रे प्रसिद्ध केली आहेत. ही कागदपत्रे पुणे येथील जमाव दप्तर सेक्शन (एल्यनेशन ऑफीस), म्हसवडचे माने घराणे, पाटणचे पाटणकर घराणे, त्रिंबकचे धेर्गे (Dherge) घराणे व नेवाशाचे कमरूद्दीन घराणे येथून मिळवलेली आहेत. यामधून शिवकाळावरील उपयुक्त माहिती मिळते.[४२]

जमाव सेक्शनमध्ये एकूण ६२ पत्रे आहेत. त्यापैकी पहिली सात पत्रे १५७९ ते १६०० या काळातील आहेत. ही पत्रे चौलच्या इतिहासासंबंधी माहिती देतात. तसेच १७ व्या शतकातील कसबा पुण्याच्या ऐतिहासिक माहितीसाठीही जमाव दप्तरातील कागदपत्रे महत्त्वाची आहेत.[४३]

२५ नं. च्या पत्रातून छत्रपतींच्या महसूलविषयक धोरणाचे दर्शन घडते. मलिक अंबर नंतर जमीनमहसूल निश्चितीची पद्धत वापरात दुर्मिळ झाली. मोरोपंत पिंगळे यांनी या पद्धतीचा पुर्नवापर कसा सुरू केला याची नवीन माहिती या पत्रातून मिळते.[४४]

३० नं ची पत्रे ही शिवाजी व शहाजी महाराजांच्या धार्मिक उदारमतवादी धोरणाची साक्ष देतात. यामध्ये जेजूरीच्या मुल्लांच्या हकीकतीचा समावेश आहे. ज्यावरून जेजुरीच्या मशिदीच्या चरितार्थासाठी शहाजी व शिवाजी महाराजांनी केलेल्या दानधर्माची माहिती मिळते. ३४, ३७, ३८, ४०, ४१, ४७, ४८, ५१ व ५८ नंबरची पत्रे राजाराम महाराजांनी दिलेल्या देणग्यांबद्दल माहिती देतात. ही कागदपत्रे मराठा इतिहासातील राजारामकालीन महत्त्वपूर्ण घटनांवर प्रकाश टाकतात.[४५]

सातारा जिल्ह्यातील म्हसवडचे माने घराणे हे त्यांच्या शौर्यामुळे प्रसिद्धीस आले होते. ६३ व ६४ नंबरची पत्रे ही त्यांच्या गुणांची साक्ष देणारी आहेत. रताजी माने यांनी जानेवारी १६६५ मध्ये मिर्झा राजा जयसिंगचा विजापूरवरील हल्ला कसा परतावून लावला हे या पत्रांवरून समजते.[४६] ग्रंथात प्रकाशित केलेली पाटणकर घराण्याची कागदपत्रे ही बहुतकरून राजाराम काळातील आहेत. यामध्ये पाटणकरांच्या धाडसी कृत्यांचे पहिल्यांदाच वर्णन करण्यात आले आहे.[४७]

त्रिंबकेश्वराचे धेर्गे हे भोसल्यांचे पुजारी (धर्मोपदेशक) होते. यामध्ये प्रकाशित केलेली पत्रे (नं.१२६ ते १३६) त्रिंबकेश्वराच्या पुजेबद्दल रंजक अशी माहिती देतात.[४८] श्री.कमरूद्दीन कलेक्शनमधून घेतलेली कागदपत्रे ही पर्शियन व मराठी अशा दोन भाषेतून आहेत. १५७५ ते १६६४ च्या दरम्यानच्या नेवासाची सामाजिक स्थिती दर्शविणारी ही कागदपत्रे असल्याने ती ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आहेत.[४९]

अशाप्रकारे शिवकाळातील अस्सल कागदपत्रे प्रकाशित करण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ.खोबरेकर यांनी केले आहे. ही कागदपत्रे अभ्यासल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास चिकित्सकपणे लिहीणे अशक्य आहे.

## मेकींग ऑफ ए प्रिन्सली हिस्टोरियन्स :

मराठेशाहीवर लिहिणारे महाराष्ट्राबाहेरील इतिहासकार थोडेच आहेत. त्यामध्ये डॉ. सुरेंद्रनाथ सेन, सर जदुनाथ सरकार याबरोबरच महाराजकुमार रघुबीरसिंग यांचे नाव



BALA. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रसिध्द आहे. महाराष्ट्राचा वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्यासाठी महाराष्ट्राबाहेरील इतिहासकारांचे महाराष्ट्रावरील इतिहासलेखन अभ्यासणे आवश्यक आहे.

जदुनाथ सरकार हे बंगालचे होते. त्यांचे मुख्य लेखन 'मुघल इंडिया' यावर असल्याने त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास लिहिला. त्यांनी औरगजेबचा इतिहास विस्तृतपणे लिहिला. हे त्यांचे मुख्य कार्य होय. तसेच 'डिक्लाईन अॅण्ड फॉल ऑफ मुघल एम्पायर' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ होय. शिवाजी ही त्यांची दुय्यम निर्मिती आहे. त्यांचे इंग्रजी सुरेख असल्याने त्यांनी लिहिलेला इतिहास रुक्ष नव्हता. औरंगजेबाचा इतिहास लिहिताना त्यांनी शिवाजीचा इतिहास लिहिला. त्यांचे सर्वोत्कृष्ट लिखाण म्हणजे 'शिवाजी अॅण्ड हिज टाईम' होय. जदुनाथ सरकारांना इंग्रजी दरबारात मान होता. ब्रिटीशांनी त्यांना 'सर' ही पदवी दिली होती. पेशवा दप्तर हे इंग्रजांच्या ताब्यात होते. तेथे मराठ्यांच्या इतिहासासाठी आवश्यक असणारी लाखो कागदपत्रे होती. रियासतकार सरदेसाई यांना मराठ्यांचा इतिहास नव्याने लिहिण्यासाठी पेशवा दप्तरमधील कागदपत्रांची आवश्यकता होती. जदुनाथ सरकार हे सरदेसाईंचे जवळचे मित्र होते. त्यामुळे त्यांनी पुण्याचे दप्तर तपासण्याची सरदेसाईंना परवानगी मिळावी अशी विनंती ब्रिटिशांना केली. त्यामुळे रियासतकार सरदेसाई नव्या साधनांच्या सहाय्याने मराठ्यांचा इतिहास लिहू शकले.

डॉ.महाराजकुमार किंवा रघुबीरसिंग यांचे नाव हिंदी साहित्यातील सर्जनशील, संवेदनशील व छायावादी लेखक म्हणून प्रसिद्ध आहे. हिंदी साहित्यातील ललित लेखनात त्यांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांच्या इतिहास लेखनास त्यामुळे एक वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यांचा जन्म राठोड-राजपूत वंशात सीतामाऊ संस्थानातील राजघराण्यात झाला. इंग्रज दडपशाही वृत्तीविषयी त्यांच्या मनात घृणा निर्माण झाली होती. त्यांची इंग्रजांविषयी तिस्काराची भावना त्यांच्या 'फ्रान्स की राज्यक्रांती के कुछ रक्तरंजित पृष्ठ' या लेखात स्पष्ट दिसते. 'माळवा इन ट्रान्झिशन' या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला. यामुळे त्यांचे नाव इतिहासकाराच्या मालिकेत नोंदविले गेले. प्रस्तुत प्रबंध

लिहित असताना त्यांनी माळव्यातील मराठ्यांच्या कामगिरीविषयी सर जदुनाथ सरकार आणि रियासतकार सरदेसाई यांनी जी मंडलोई घराण्याची कागदपत्रे वापरली होती, ती सर्व अविश्वसनीय आहेत हे सप्रमाण दाखवून दिले. रघुबीरसिंहांनी कागदपत्रातील कालनिश्चिती कशी करावी, याविषयी 'दी जुलूसी सनएज ऑफ दी मुघल एम्पायर ऑफ इंडिया' ही पुस्तिका प्रकाशित केली.

डॉ.रघुबीरसिंग हे केवळ साहित्यिक, इतिहासकार नव्हते तर सामाजिक बांधीलकी मानणारे राजनीतीतज्ञही होते. ते संस्थानिकांना ब्रिटिश शासनाने नियुक्त केलेल्या लष्करामधील सन्माननीय अधिकारी होते. संस्थानातील पायाभूत सुधारणांसाठी त्यांनी प्रयत्न केले. विलिनीकरणाच्या वेळी त्यांनी स्वत: पुढाकार घेवून सर्वप्रथम आपले संस्थान भारतीय संघराज्यात विलिन केले. त्यांचे तत्कालिन अनेक थोर इतिहासकारांशी सौहार्दपूर्ण संबंध होते. सुप्रसिद्ध इतिहासकार जदुनाथ सरकार व रियासतकार सरदेसाई यांच्याबरोबर त्यांचा पत्रव्यवहार होता. आणि अनेकदा चर्चा विचारविनिमयही होत असे. जदुनाथ सरकारांच्या सहकार्याने त्यांनी 'दौलतराव सिंधिया अॅण्ड नॉर्थ इंडियन अफेअर्स' या ग्रंथाचे संपादन केले.[५०]

जदुनाथ सरकार यांनी महाराजकुमार यांना लिहिलेल्या पत्रांचा एक वेगळा खंड काढावा अशी श्री. रा. टिकेकर यांची इच्छा होती.[५१]

श्री. रा.टिकेकर यांनी डॉ.वि.गो.खोबरेकर यांच्या सहकार्याने सर जदुनाथ सरकार यांनी महाराजकुमारांना पाठविलेली २० सप्टेंबर १९३३ ते १५ मार्च १९५८ दरम्यानची ३२९ पत्रे 'मेकिंग ऑफ ए प्रिन्सली हिस्टेरियन' या ग्रंथात छापली आहेत.[५२] ही पत्रे केवळ चरित्रात्मक नसून त्याला ऐतिहासिक मूल्य आहे. यातून डॉ. जदुनाथ सरकार यांच्यातील, इतिहासकारास आवश्यक असणाऱ्या उत्कृष्ट गुणांचे दर्शन घडते. महाराज कुमारही स्वत: काही प्रश्न निर्माण करीत व त्यांची उत्तरे तर्कशुद्धरीत्या देण्याचा प्रयत्न करीत. त्यांचा 'पूर्व मध्यकालीन भारत' हा लेख त्याचेच द्योतक आहे. इतिहासाचे

तत्वज्ञान, इतिहासशास्त्र वगैरेंविषयी त्यांनी स्वत: काही प्रश्न निर्माण करुन तत्संबंधी विविध नियतकालिकांतून या विषयाचे विवेचन करणारे अत्यंत विचारप्रवर्तक शोध लिहिले आहेत. आणि आपली इतिहासाच्या तत्वज्ञानाविषयी तसेच इतिहास हे शास्त्र आहे का? अशा प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली आहेत. नवीन मुद्द्यांच्या आधारे त्यांनी नवीन इतिहास मांडला.[५३] 'मेकिंग ऑफ ए प्रिन्सली हिस्टोरियन' या ग्रंथामध्ये सर जदुनाथ सरकार आणि महाराजकुमार यांच्यातील ऐतिहासिक घटनांबाबत व ऐतिहासिक साधन सामुग्री बाबत झालेली चर्चा आहे त्यामुळे या ग्रंथास ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे.[५४] ही पत्रे प्रसिध्द होण्यापूर्वी श्री.रा.टिकेकर यांनी 'जदुनाथ सरकार आणि रियासतकार सरदेसाई' हा तौलानिक चरित्रात्मक ग्रंथ लिहिला होता. यामधील 'पत्रसंभार' या प्रकरणामध्ये, जदुनाथ सरकारांच्या या पत्रांचे महत्त्व विशद करताना ते म्हणतात, ''पंजाब युनिव्हर्सिटीने जदुनाथांच्या पत्रांचे दोन खंड प्रसिद्ध केले. परंतू पंजाब युनिव्हर्सिटीच्या या ग्रंथात मला, रियासकार सरदेसाई यांना तसेच डॉ. दिघे, डॉ.हरि राम गुप्ता याबरोबरच डॉ. रघुवीरसिंग अशांना आलेली जदुनाथांची पत्रे मिळविली म्हणजे हा संग्रह खरोखर मोठा अपूर्व होईल, अमोलिक होईल. अभ्यासूंना मार्गदर्शक ठरेल.''[५५] श्री.रा.टिकेकर पुढे म्हणतात, ''जदुनाथांची लेखनशैली, त्यांचे सडेतोड मतप्रदर्शन आणि त्यांच्या लेखनात सहज डोकावणारा विनोद या सर्वांमुळे त्यांची पत्रे वाङ्‌मयीन गुणांसाठी, संशोधकांना मार्गदर्शक म्हणून सविस्तर छापून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.''[५६]

अशाप्रकारे ही पत्रे महत्त्वाची आहेत. परंतू प्रस्तुत ग्रंथात केवळ सर जदुनाथ सरकार यांच्याच पत्रांचा समावेश आहे. त्यामुळे पत्रांचा विषय लगेच लक्षात येत नाही.

अशाप्रकारे डॉ.खोबरेकर यांच्या ऐतिहासिक साधन सामुग्रीच्या प्रकाशनाची व्याप्ती मोठी आहे. याशिवाय इ. स. १९७४ मध्ये श्री. शिवराज्याभिषेक त्रिशतसांवत्सरिक समारोह सर्वत्र साजरा झाला. या समारोह वर्षात मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाने महाराष्ट्र इतिहास परिषद बोलविली होती. या अधिवेशनात वाचलेल्या

निबंधाचा संग्रह 'निबंधसंग्रह' या शीर्षकाखाली त्यांनी प्रसिद्ध केला. ही परिषद केवळ शिवपूर्वकाल व शिवकाल यापुरतीच मर्यादित होती. यात प्रा. न.र.फाटक, डॉ.पु.म.जोशी या विभागीय अध्यक्षांची विद्वत्ताप्रचुर भाषणे आहेत. तसेच 'पावन शिवतीर्थ', 'शिवकालीन सामाजिक प्रवृत्ती व प्रवाह', 'शिवकालीन मानचिन्ह', 'महाराजांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन' व 'धार्मिक धोरण' आदि शोधनिबंधांचा अंतर्भाव या संग्रहात आहे. इतिहासाभ्यासूंस हा ग्रंथ उपयुक्त आहे. तसेच मा. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने सोपविलेले, मा.श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या विधानसभेतील भाषणांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचे कार्यही डॉ. खोबरेकर यांनी केले आहे. या भाषणांमधून त्योवेळची महाराष्ट्राची राजकीय, आर्थिक परिस्थिती व यशवंतराव चव्हाण यांची कामगिरी समजते. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाचा हा महत्त्वाचा साधनग्रंथ आहे.

## महाराष्ट्रातील दप्तरखाने :

दप्तरखाना म्हणजे दप्तरे ठेवण्याची जागा. जुन्या पण उपयुक्त कागदपत्रांचे भांडार. ज्या-ज्या राजसत्ता आतापर्यंत होऊन गेल्या, त्यांचे व्यवहार कागदपत्रावर लिहिले आहेत. हिशोबाच्या, कारभाराच्या वह्या, कागदपत्रे ज्या ठिकाणी ठेवलेले असतात त्या ठिकाणास 'दप्तरखाना' म्हणतात.

महाराष्ट्रातील दप्तरखाने ऐतिहासिक साधनांनी भरलेले असल्यामुळे अभ्यासूंच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. डॉ.खोबरेकर यांनी इतिहासाच्या अभ्यासासाठी व लेखनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्रीचे प्रकाशन तर केलेच, याबरोबरच त्यांनी ऐतिहासिक साधनसामुग्री जेथे उपलब्ध होते अशा दप्तरखान्यांबद्दलही महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. त्यांनी सर्व दप्तरखान्यात असलेला पत्रसंभार, त्यावर आधारित प्रसिद्ध झालेले संशोधकीय ग्रंथ व दप्तरखाने राखावयाचे तंत्र याबद्दलची माहिती आत्मसात केली व त्याआधारे 'महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र)' हा ग्रंथ लिहिला.[५७]

अधिकारपदावर असताना त्यांनी हिंदुस्थानातील प्रमुख राज्यदप्तरखान्यातील ऐतिहासिक साधनांचा महाराष्ट्राचा इतिहास दृष्टीने शोध घेतला. या परिश्रमामुळेच त्यांना हा ग्रंथ तयार करणे शक्य झाले.[५८]

## दप्तरखान्यांचे महत्त्व :

इतिहासाचा साक्षेपी आणि तपशीलवार अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणारी जुनी ऐतिहासिक कागदपत्रे दप्तरखान्यात असतात. वा.सी.बेंद्रे यांच्या मते, ''ऐतिहासिक साधनांचा संग्रह करणे हा शास्त्रशुद्ध इतिहासरचनेतील पहिला टप्पा आहे.''[५९] इतिहासशास्त्रात गतकाळाची माहिती देणाऱ्या सर्व शास्त्रांचा अंतर्भाव होतो. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक इतिहासाची जडणघडण करण्यास ऐतिहासिक दप्तरांचा उपयोग होतो. १८ व्या व १९ व्या शतकातील सर्वांगिण इतिहासाचा अभ्यास पुणे येथील पेशवे दप्तर, मुंबई रेकॉर्ड ऑफिस, कोल्हापूर, नागपूर, बडोदे, ग्वाल्हेर येथील दप्तरखाने यातील ऐतिहासिक दप्तरांद्वाराच करावा लागतो.

अशाप्रकारे दप्तरातील कागदपत्रे हे इतिहासाचे अमोल साधने आहेत. या कागदपत्रांच्या आधारे सत्य इतिहास मांडला जातो. परंतू यासाठी अभ्यासकांना या ऐतिहासिक दप्तरखान्यांची पूर्ण माहिती असणे म्हणजे कोणत्या दप्तरखान्यात कोणत्या विषयाची कागदपत्रे उपलब्ध आहेत याची माहिती असणे आवश्यक आहे. ही माहिती उपलब्ध करुन देण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. खोबरेकर यांनी 'महाराष्ट्रातील दप्तरखाने' हा ग्रंथ लिहून केले आहे.

डॉ. खोबरेकरांच्या या ग्रंथातील वर्णनात्मक भाग भरपूर माहितीने भरलेला आहे. ठिकठिकाणच्या दप्तरखान्यात काय काय आहे, तेथील कागदपत्रांची संख्या व स्वरुप काय आहे आणि त्यांची उपयुक्तता काय आहे. त्याची ही जंत्रीच आहे.

डॉ. खोबरेकर यांनी दप्तरखान्यातील कादपत्रांची केवळ माहितीच दिली नाही. तर या कागदपत्रांची उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांनी ही कागदपत्रे जतन करण्याचे तंत्रही

सांगितले आहे.[६०] यामागे राष्ट्राचा बहुमोल ठेवा असणाऱ्या दप्तरखान्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे याची आपल्याला जाणीव व्हावी हा त्यांचा उद्देश आहे.[६१]

ऐतिहासिक साधनसामुग्रीची अशा प्रकारची तपशीलात माहिती डॉ.के.एन.चिटणीस यांनी त्यांच्या 'रिसर्च मेथोडोलॉली इन हिस्ट्री' या ग्रंथात दिली आहे. परंतू ती इंग्रजीमधून असल्यामुळे सामान्यजनांच्या लक्षात सहजपणे येत नाही. तसेच वा.सी.बेंद्रे यांच्या 'महाराष्ट्रेतिहासाचे संशोधनक्षेत्र व साधनसंपत्ती' या ग्रंथामध्येही ऐतिहासिक साधनांची जोपासना करण्याची माहिती आहे. परंतू ती डॉ. खोबरेकर यांनी दिलेल्या माहितीएवढी विस्तृत नाही. ग.ह.खरे यांनी दोन खंडामध्ये हिंगणे दप्तराची स्वतंत्रपणे माहिती दिली आहे. तर सदाशिव आठवले यांनी हिंगणे दप्तर या ग्रंथाचा तिसरा खंड लिहिला आहे. परंतु महाराष्ट्रातील सर्व दप्तरखान्यांची एकत्रितपणे माहिती मिळविण्यासाठी डॉ.खोबरेकरांच्या 'महाराष्ट्रातील दप्तरखाने' या ग्रंथास पर्याय नाही. म्हणूनच त्यांच्या या ग्रंथास महाराष्ट्र शासनाकडून १९७० सालातील उत्कृष्ठ ग्रंथ म्हणून पारितोषिक मिळाले आहे.[६२]

## मूल्यमापन :

डॉ.खोबरेकर यांनी इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणारी असंख्य कागदपत्रे प्रकाशित केली. या साधनांच्या सहाय्याने मराठ्यांच्या व आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकता येतो. त्यांनी मोडी लिपीतील कागदपत्रांची सूची प्रकाशित केल्यामुळे इतिहासावर संशोधन करण्याची प्रक्रिया सोपी झाली आहे. मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तीची हस्ताक्षरयुक्त पत्रे अभ्यासल्यास तत्कालिन लेखनकला, भाषा तसेच सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा बोध होतो. डॉ.खोबरेकर यांनी केवळ प्रसिद्ध राजकारणी व्यक्तींच्या जीवनावरीलच कागदपत्रे प्रकाशित केली नाहीत तर हुतात्मा चाफेकरांसारख्या क्रांतीकारकांचेही आत्मवृत्त त्यांनी प्रकाशित केले हे आत्मवृत्त तसेच

त्यांनी प्रकाशित केलेली 'महाराष्ट्र आर्काईव्हज बुलेटिन्स' ही आधुनिक महाराष्ट्राबरोबरच आधुनिक भारताच्या इतिहासाचीही महत्त्वाची साधने आहेत. कारण आत्मवृत्तामधून क्रांतीकारकांच्या मनाची तळमळ व्यक्त होते व त्यातून क्रांतिकारी पर्वाची पार्श्वभूमी कशी घडून आली असेल याची कल्पना येते.तर आर्काईव्हज बुलेटिनमध्ये स्वातंत्र्याकरीता जे सशस्त्र उठाव झाले, त्यासंबंधिच्या हकिकतीची तत्कालीन कागदपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. डॉ.खोबरेकर यांनी इतिहाससाधने इंग्रजीमधूनही प्रसिद्ध केली आहेत. 'तारीखे दिल्कुशा' हा मूळचा फारसी भाषेतील ग्रंथ इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करुन त्यांनी मराठी भाषेचे ज्ञान नसणाऱ्या इतिहास अभ्यासूंना मराठ्यांच्या इतिहासाभ्यासाचे नवीन दालन उघडून दिले. मराठी अभ्यासकांस याचा उपयोग होईलच पण हा ग्रंथ इंग्रजीत असल्यामुळे अमराठी अभ्यासकांनाही याचा उपयोग होईल. इंग्रजी कागदपत्रांच्या व साधनग्रंथाच्या प्रकाशनांमुळे डॉ.खोबरेकर यांचे कार्य जागतिक पातळीवर पोहोचण्यास मदत झाली आहे. शिवकालीन कागदपत्राद्वारे मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त काही नवीन माहिती प्रथमच प्रकाशित झाली आहे. इतिहासांचे संदर्भसाधन म्हणून त्याचे मोल जास्त आहे. अशाप्रकारे डॉ.वि.गो.खोबरेकर यांनी ऐतिहासिक सामुग्रीची प्रकाशने प्रसिद्ध करुन इतिहास अभ्यासकांना मराठ्यांच्या इतिहासाबरोबरच आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास समजावून घेण्यासाठी आवश्यक असलेली साधनभूमी समृद्ध करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांचे हे अमूल्य कार्य इतिहास संशोधकांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारे आहे.

डॉ.खोबरेकर हे महाराष्ट्र राज्याच्या पुराभिलेख विभागाचे सहाय्यक संचालक होते. या पदावर असताना त्यांनी सर्व दप्तरखान्यात असलेला पत्रसंभार, त्यावर आधारित प्रसिद्ध झालेले संशोधकीय ग्रंथ व दप्तरखाने राखावयाचे तंत्र याबद्दलची माहिती आत्मसात केली. त्यासाठी त्यांच्या महाराष्ट्रातील दप्तरखान्यांशी निकटचा संबंध आला. त्यामुळे दप्तरखान्याविषयी त्यांनी दिलेली माहिती ही अनुभवाने मिळविलेली आहे. त्यामुळे ती विश्वसनीय आहे.

**संदर्भ व तळटिपा :**


१. डॉ. खोबरेकर वि.गो.–'संपादकीय (इतिहास संशोधन मंडळाने तडीस नेलेले दोन उपक्रम)' 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' 'त्रैमासिक', जानेवारी–मार्च १९९७, पृ–५६

२. डॉ. खोबरेकर वि.गो. – 'अभ्यासूंच्या सोयीसाठी कोल्हापूर दप्तरखान्यातील ऐतिहासिक कागदपत्रांचे वर्णनात्मक सूचीकरण', भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक' जुलै–सप्टेंबर २००४, पृ. १८–१९.

३. डॉ.खोबरेकर प्रकाश –'कोकण साहित्यभूषण सन्मानीत डॉ.वि.गो.खोबरेकर यांनी मुंबई रेकॉर्ड ऑफिस या शासकिय इतिहास संस्थेत केलेले योगदान', 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', जुलै–सप्टेंबर २००४, पृ. ७

४. डॉ. खोबरेकर वि.गो.–'अभ्यासूंच्या सोयीसाठी कोल्हापूर दप्तरखान्यातील ऐतिहासिक कागदपत्रांचे वर्णनात्मक सूचीकरण' 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' 'त्रैमासिक', जुलै–सप्टेंबर २००४, पृ. १९

५. शास्त्री सुशीला– ग्रंथपरिचय (कोल्हापूर अभिलेखालय वर्णनात्मक सूची खंड – एक), 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', जुलै– १९७२, पृ.९८

६. डॉ. खोबरेकर वि.गो. – उपरोक्त, पृ. १९

७. डॉ.खोबरेकर वि.गो. – इतिहासाभ्यासूंना वरदान ठरलेली पेशवे दप्तरांतील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची, 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', जुलै–सप्टेंबर २००४, पृ.१४

८. कित्ता – पृ. १५

९. कित्ता – पृ. १६

१०. डॉ. खोबरेकर वि.गो. –'संपादकीय (इतिहास संशोधन मंडळाने तडीस नेलेले दोन उपक्रम) , 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', जानेवारी–मार्च १९९७, पृ. ५६

११. कित्ता – पृ. ५६

१२. दिक्षित मोरेश्वर व डॉ.खोबरेकर वि.गो. (संपादक) – मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे, शासकीय मध्यवती मुद्रणालय, मुंबई, १९६९, पृ. ५६–६५

१३. कित्ता – पृ. ७४–७५

१४. कित्ता – पृ. ६६–६९

१५. कित्ता – पृ. १०४–१११

१६. कित्ता – पृ. ३२८–३३३

१७. कित्ता – पृ. ३३८–३४५

१८. डॉ. खोबरेकर वि.गो.व शिंदे शं.स.(संपादक) – कोकणच्या इतिहासाची साधने– १६९२–१८२८) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, १९७१–प्रस्तावना, पृ.१

१९. कित्ता – प्रस्तावना , पृ.४

२०. कित्ता – प्रस्तावना, पृ.४

२१. डॉ.खोबरेकर वि.गो. (संपादक) – तारीख–ए–दिल्कुशा (सर जदुनाथ सरकार बर्थ सेंटेनरी कॉममोरेशन व्हॉल्युम), गव्हर्नमंट ऑफ महाराष्ट्र, १९७२, पृ. १

२२. कित्ता – पृ. १२७

२३. कित्ता – पृ. १३२

२४. कित्ता – पृ. १७३

२५. कित्ता – पृ. २०६

२६. डॉ. खोबरेकर प्रकाश –'कोकण साहित्यभूषण सन्मानीत डॉ.वि.गो.खोबरेकर यांनी मुंबई रेकॉर्ड ऑफिस या शासकिय इतिहास संस्थेत केलेले योगदान', 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', जुलै–सप्टेंबर २००४, पृ. ५

२७. देसाई संजीव –'पुस्तक परीक्षण – महाराष्ट्र अर्काइव्हज बुलेटीन क्र.४, 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक', ऑक्टोबर १९६९, पृ.८९

२८. डॉ. खोबरेकर प्रकाश – उपरोक्त, पृ.५

२९. कित्ता – पृ.५

३०. देसाई संजीव – उपरोक्त – पृ.८९

३१. कित्ता – पृ. ८९

३२. कित्ता – पृ. ८९

३३. डॉ.खोबरेकर प्रकाश –उपरोक्त, पृ. ६

३४. डॉ.खोबरेकर वि.गो.–महाराष्ट्रातील स्वांतत्र्य लढे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९४, प्रस्तावना, पृ.१४

३५. डॉ.खोबरेकर प्रकाश –उपरोक्त पृ. ६

३६. डॉ. खोबरेकर वि.गो. (संपादक)– हुतात्मा दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – १९७४, प्रस्तावना , पृ.१

३७. कित्ता – प्रस्तावना , पृ. २

३८. कित्ता – पृ. ७७

३९. कित्ता – पृ. ९०

४०. डॉ. खोबरेकर प्रकाश – उपरोक्त – पृ. ७

४१. कित्ता – पृ. ८

४२. डॉ.खोबरेकर वि.गो. (संपादक) – रेकॉर्ड्स ऑफ शिवाजी पिरीयड, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई–१९७४, पृ. ३ – २३६

४३. कित्ता – पृ. ३–१०

४४. कित्ता – पृ. ६२

४५. कित्ता – पृ. ७६,८१,८४,८५,८७,८९,९८,९९,१०२,११०

४६. कित्ता – पृ. १२३, १२४

४७. कित्ता – पृ. १७३–२०१

४८. कित्ता – पृ. २०५–२१८

४९. कित्ता – पृ. २२१–२३६

५०. डॉ.देशपांडे सु. र. – 'रघुवीरसिंह, डॉ.महाराजकुमार', मराठी विश्वचरित्र कोश – खंड ४, विश्वचरित्र संशोधन केंद्र, गोवा, जानेवारी– २००७, पृ. ७०–७३

५१. टिकेकर श्री.रा. – जदुनाथ सरकार आणि रियासतकार सरदेसाई (तौलानिक चरित्रात्मक अभ्यास), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१, अर्घ्यप्रदान पृ. ९

५२. डॉ. देशपांडे सु.र. – उपरोक्त पृ. ७०–७३

५३. डॉ. देशपांडे सु.र. – उपरोक्त पृ. ७०–७३

५४. डॉ.खोबरेकर वि.गो. व श्री. रा.टिकेकर – मेकिंग ऑफ ए प्रिन्सली हिस्टोरियन, डायरेक्ट ऑफ अर्काईव्हज अॅण्ड अर्काईलॉजी, मुंबई – १९७५ [Foreword (Ali Yavar Jung) – Page – Vii)]

५५. टिकेकर श्री. रा. – जदुनाथ सरकार आणि रियासतकार सरदेसाई (तौलानिक चरित्रान्मक अभ्यास), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१, पृ. ५४

५६. कित्ता – पृ. ८३

५७. डॉ. खोबरेकर वि.गो.–महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मंबई, १९६८, पृ. ६–८७

५८. कुलकर्णी ज.बा.–'इतिहासाचार्य कै.डॉ.वि.गो.खोबरेकर','भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'त्रैमासिक',ऑक्टोबर–डिसेंबर २००७, पृ.७

५९. बेंद्रे वा. सी.–महाराष्ट्रेतिहासाचे संशोधन क्षेत्र व साधनसंपत्ती, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६६, पृ. ८३

६०. डॉ. खोबरेकर वि.गो. – महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६८,पृ.८७

६१. कित्ता – पृ. ३

६२. कुलकुर्णी ज. बा. – उपरोक्त, पृ. ७